२

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम -३ मधील तरतूदींच्या अनुषंगाने पर्यावरण विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ या क्षेत्रिय कार्यालयामार्फत सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांक- मलोहअ-२०१५/प्र.क्र.२४३/आस्थापना
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - १८ जानेवारी, २०१६.

वाचा :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिधियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिधियम क्रमांक ३१).

प्रस्तावना :-

राज्य शासनामार्फत राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व कालमर्यादेत लोकसेवा उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ प्रख्यापित केला असून तो दिनांक २८.४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाने सदर अधिनियम लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या सदर अधिनियमाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. सदरहू निर्गमित करण्यात आलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे मार्फत पुरविण्यात येत असलेल्या सेवा सदर अधिनियमातंर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व त्यांच्या स्थानिक कार्यालयामार्फत पुरविण्यात येणा-या विविध सेवा-सुविधांचा लाभ राज्यातील लोकांना / नागरिकांना / उद्योगांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने निर्गमित केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ मधील सेवा पुरविण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रपत्रातील एकूण ४ सेवा राज्यातील या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व त्यांच्या स्थानिक कार्यालयाशी निगडीत असलेल्या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम -३ नुसार अधिसूचित करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच, सदर सेवा पुरविण्याबाबत आवश्यक असलेला अर्ज, प्रमाणपत्र, शुल्क निश्चित करून तो Maha Online वर उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही माहिती व तंत्र संचालनालयातील संबंधितांशी संपर्क साधून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तातडीने पूर्ण करावी.

३. या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद केलल्या सेवांमध्ये अथवा सेवा पुरविण्याची कालमर्यादा तसेच, या सेवा पुरविण्याकरीता पदनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सुधारणा करता येतील.

४. उपरोक्तनुसार सेवा अधिसूचित करण्यात आल्यानंतर या लोकसेवांची सूची, सेवा पुरविण्याची कालमर्यादा, विहित अर्ज व नमुने, सेवेसंदर्भातील शुल्क, या सेवा पुरविण्याकरीता पदनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व त्यांच्या स्थानिक कार्यालयांच्या सूचनाफलकावर, तसेच त्यांच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर प्रदर्शित करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१२५६१९४२०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af0534418cf52d1ac844331c4116879d, cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2016.01.19 12:58:10 +05'30'

( सो. ना. बागुल )
सह सचिव, पर्यावरण विभाग

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य,
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, (पत्राने),
७. मा. मुख्य माहीती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, (पत्राने)
८.मा.राज्य निवडणुक आयोग यांचे कार्यालय,
९. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी,
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मंबुई /नागपूर / औरंगाबाद/ (पणजी) खंडपीठ, (पत्राने)
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१७. सर्व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालये.

१८. सर्व महानगर पालिका आयुक्त.
१९. सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायती यांचे मुख्याधिकारी.
२०. सर्व मंत्रालयीन विभाग,
२१. पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने,
२२. निवड नस्ती आस्थापना, पर्यावरण विभाग.

## प्रपत्र-अ

**शासन निर्णय क्रमांक- मलोहअ-२०१५/प्र.क्र.२४३/आस्थापना, दि. १८ जानेवारी ,२०१६ चे प्रपत्र.**

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | भांडवली गुंतवणूक (रू.कोटी मध्ये) | | | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लाल संवर्गात मोडणारे उद्योग | नारिंगी संवर्गात मोडणारे उद्योग | हिरव्या संवर्गात मोडणारे उद्योग | | |
| १ | उद्योग उभारणीसाठी संमतीपत्र | १२० दिवस | उप प्रादेशिक अधिकारी | निरंक | निरंक | रु.५० कोटीपर्यंत | प्रादेशिक अधिकारी | संबंधित विभाग प्रमुख |
| २ | उद्योग सुरु करण्यासाठी संमतीपत्र | १२० दिवस | उप प्रादेशिक अधिकारी | निरंक | निरंक | रु.५० कोटीपर्यंत | प्रादेशिक अधिकारी | संबंधित विभाग प्रमुख |
| ३ | उद्योग उभारणीसाठी संमतीपत्र | १२० दिवस | प्रादेशिक अधिकारी | * रु.१० कोटीपर्यंत | रु.१५० कोटीपर्यंत | रु.५० ते रु.५०० कोटीपर्यंत | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक सचिव (तांत्रिक) |
| ४ | उद्योग सुरु करण्यासाठी संमतीपत्र | १२० दिवस | प्रादेशिक अधिकारी | *रु.१० कोटीपर्यंत | रु.१५० कोटीपर्यंत | रु.५० ते रु.५०० कोटीपर्यंत | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक सचिव (तांत्रिक) |

*** प्रादेशिक अधिकारी यांचे अखत्यारीत येत नसलेल्या उद्योगांच्या सूचीमधील उद्योग वगळून इतर उद्योग.**

*****